जा.क्र.उमा१/कोवि/वैमा/नाहरकत/उमा/१०६३०-३२
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
दिनांक - ६/५/२०१७

प्रति,

अध्यक्ष/ सचिव, /प्राचार्य/ मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विनअनुदानित/ स्वंयअर्थसहाय्यित
उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविदयालये, कोल्हापूर विभाग.

विषय — अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/क.महा. विदयालयाचे वर्ग /तुकडयावरील पायाभूत मंजूर पदावर शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीस नाहरकत प्रमाणपत्राबाबत जाहीरात देणेस परवानगीबाबत

संदर्भ- १) शासन निर्णय क्र. एचएससी०७/२०-२१, दि. ६/५/१९७६, ६/९/१९९९, १३/१०/२०००,
२) शा.नि. क्र. एचएससी१७०४/(३६३/०४)/उमाशि-१, दि. २४/२/२००९
३) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. ६/२/२०१२, २/५/२०१२, २०/६/२०१४, १९/७/२०१४, व दि. ४/६/२०१६
४) आपल्या संस्थेचा/शाळेचा पदभरतीस परवानगीबाबतचा प्रस्ताव
५) मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील समितीचा निर्णय दिनांक २९/१२/२०१६ चे इतिवृत्त

वरील विषय संदर्भानुसार आपण अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विनअनुदानित/ स्वंयअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविदयालये अनुदानित उच्च माध्यमिक विभागाकडील रिक्त पदे भरतीस परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

सदर प्रस्ताव शासन निर्णय दि. १९/७/२०१४ व दि.४/६/२०१६ मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त, शिक्षण यांचे अध्यक्षतेखालील समितीकडे सादर करणेत आलेले होते. यानुषंगाने सदर समितीने खाली नमूद तपशिलाप्रमाणे पद भरतीस परवानगीबाबत नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

***१) ज्या अल्पसंख्याक शाळांनी शासन निर्णय दि. १३/७/२०१६ नुसार या कार्यालयाकडे पदभरतीसाठी प्रस्ताव सादर केलेला असेल अशा उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयातील दि. ३१/५/२०१७ पर्यंत पायाभूत मंजूर रिक्त पदे भरतीस परवानगी देणेत येत आहे. (सन २०१७-१८ साठी)***

***२) अनुदानित उच्च माध्यमिक कडील घडयाळी तासिका तत्वावरील, रजा कालावधीतील, अर्धवेळ पदावरील नियुक्त्या हया हंगामी/ तात्पुरत्या स्वरुपातील असलेने अशा नियुक्त्या करण्यासाठी पदभरतीस परवानगी देणेत येत आहे. (सन २०१७-१८ साठी)***

***३) विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील पदांचे समायोजन केले जात नसलेने अशा उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालयातील सर्व रिक्त पदे (पूर्णवेळ/अर्धवेळ/सीएचबी) भरण्यास परवानगी देणेत येत आहे. ( सन २०१७-१८ साठी)***

वरील प्रमाणे पदे भरतीसाठी परवानगी ही खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून देणेत येत आहे. सदर अटी/शर्तीचा भंग करुन पद भरती केल्यास अशा नियुक्त्यांना मान्यता देणेत येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१) संस्थेमध्ये उच्च माध्यमिक विभागाकडे अतिरिक्त शिक्षक नसला पाहीजे. व तसे प्रतिज्ञापत्र संस्थेने सादर करणे बंधनकारक राहील.

२) सदर नियुक्ती ही पायाभूत मंजूर रिक्त असलेल्या पदावर ( सेवानिवृत्ती, पदोन्नती, राजीनामा, मयत, इ. कारणाने पद रिक्त झालेले असले पाहीजे.) केली पाहीजे.

३) पायाभूत पद मंजूर नसल्यास अथवा पद रिक्त नसल्यास सदरची पद भरतीची परवानगी आपोआप रदद होईल.

४) संस्थेने जाहीरात देताना वस्तुस्थितीशी विसंगत तपशील देऊन नेमणूक केल्यास व अशी बाब निदर्शनास आल्यास सदरची नियुक्तीस मान्यता नाकारणेत येईल. व सदर कर्मचा-याने केलेल्या कामाचे वेतन संबंधित संस्थेने देणे बंधनकारक राहील.

५) जाहिरात प्रसारण व मुलाखत दिनांक यामध्ये पुरेसा कालावधी दिला जाईल. (किमान १० दिवस )

६) उच्च माध्यमिक नियुक्तीबाबत शा.नि. १३/१०/२०००, दि. १०/६/२००५, शा.नि. ६ फेब्रुवारी २०१२, २० जून २०१४ व दि.१९ जुलै २०१४, त्या संबंधीचे शासन निर्णय यामधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

७) जाहिरात दिल्याच्या दिवसापासून संस्थेने सदर पदे भरण्याची कार्यवाही दोन महिन्याच्या आत करणे बंधनकारक राहील. व सन २०१७-१८ च्या संच मान्यतेनंतर आयोजित वैयक्तिक मान्यता शिबीरामध्ये सदर प्रस्ताव सादर करावे लागतील.

८) सन २०१७-१८ च्या संच मान्यतेनुसार अशी भरणेत आलेली पदे अस्तित्वात नसल्यास/कार्यभारानुसार मंजूर नसल्यास अशा पदावर नियुक्त्यांना मान्यता दिली जाणार नाही.

**९) सदर पदासाठी यापूर्वी विनापरवानगी जाहीरात दिलेली असल्यास ती ग्राहय धरली जाणार नाही. या परवानगीनंतर जाहीरात देवून सदर पदे भरली असल्यासच त्यांचे मान्यतेबाबत विचार करणेत येईल.**

१०) जाहीरात ही सर्वाधिक खपाच्या दोन वर्तमानपत्रामध्ये सर्व तपशिलासह देण्यात यावी. ( यामध्ये पदाचा विषय, माध्यम, पदासाठीची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, पदाची वेतनश्रेणी/मानधन, पदासाठी उपलब्ध कार्यभार, अर्धवेळ/सीएचबी/रजाकालावधी पद, पदाचा अनुदान प्रकार- अनुदानित/विनाअनुदानित/कायमविनाअनुदानित/ स्वंयअर्थसहाय्यित इ. सर्व )

**११) उपरोक्त जाहीरात परवानगी नुसार करणेत आलेल्या नियुक्त्यांना मान्यतेसाठीचे शिबीर आयोजन स्वतंत्ररित्या करणेत येईल. सदर शिबीरामध्ये परिपूर्ण प्रस्ताव चेकलिस्ट प्रमाणे सादर करणेत यावेत. सदर शिबीरावेळी सादर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यास त्रुटींची पूर्तता करुन १५ दिवसांत या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील. नियुक्ती दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत त्रुटी पूर्तता होत नसल्यास अशा नियुक्त्यांना मान्यता देण्यात येणार नाहीत व अशा नियुक्त्या रदद करणे संस्थेवर बंधनकारक राहील.**

**(एम.के.गोंधळी)**
सदस्य सचिव तथा,
शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहितीस्वत सविनय सादर----

१) मा. अध्यक्ष तथा आयुक्त शिक्षण महाराष्ट्र राज्य, सेनापती बापट मार्ग, पुणे

२) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे १